लोकमत मुंबई । सोमवार ३०.१२.२०२४

# नवी मुंबई विमानतळावर व्यावसायिक विमानाचे यशस्वी लँडिंग

## अखेर ठरले...! नव्या वर्षात १७ एप्रिलपासून प्रवासी, कार्गो सेवेचा होणार प्रारंभ; मार्चपर्यंत मिळणार आवश्यक त्या सर्व परवानग्या

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी मुंबई :** देशाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प म्हणून उभारलेल्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर रविवारी दुपारी दीडच्या सुमारास 'इंडिगो ए ३२०' या व्यावसायिक विमानाचे यशस्वी लँडिंग करण्यात आले. हा ऐतिहासिक क्षण पाहण्यासाठी नवी मुंबईकरांनी मोठी गर्दी केली होती. विमानाचे लँडिंग होताच उपस्थितांनी टाळ्या वाजवून स्वागत केले.

नवीन वर्षात या विमानतळावरून प्रत्यक्ष प्रवासी आणि कार्गो सेवा सुरू करण्याच्या दृष्टीने संबंधित यंत्रणा कामाला लागल्या आहेत. त्यादृष्टीने तीन महिन्यांपूर्वी म्हणजेच ११ ऑक्टोबर रोजी विमानतळावर 'सुखोई' या लढाऊ विमानाचे लँडिंग करण्यात आले होते. त्यानंतर रविवार, २९ डिसेंबर रोजी इंडिगोचे विमान उतरविण्यात आले. यावेळी नागरी विमान वाहतूक महासंचालनालय, भारतीय विमानतळ प्राधिकरण तसेच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ लिमिटेड कंपनी आणि सिडकोचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

### आंतरराष्ट्रीय उड्डाणांसाठी जून उजाडणार

१७ एप्रिल २०२५ पासून देशांतर्गत विमानसेवेचे उद्घाटन होईल. मात्र, आंतरराष्ट्रीय विमानसेवेचे उद्घाटन होण्यास जून उजाडेल, असे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ लि.चे मुख्य कार्यकारी अधिकारी बी. व्ही. जेके शर्मा यांनी यावेळी स्पष्ट केले.

(छाया : भालचंद्र जुमलेदार)



### विमानाला वॉटर सलामी

इंडिगो एअरलाइन्सच्या विमानाचे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या धावपट्टीवर लँडिंग होताच उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात स्वागत केले. याप्रसंगी प्रथेप्रमाणे ऑस्ट्रेलिया बनावटीच्या दोन अग्निशमन बंबांमधून विमानाला वॉटर सलामी देण्यात आली.

### महाराष्ट्रासाठी अभिमानास्पद क्षण!



नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर पहिली व्यावसायिक विमान उड्डाण मान्यता चाचणी यशस्वीपणे पार पडली. हा समस्त महाराष्ट्रासाठी अभिमानास्पद क्षण आहे. इंडिगो ए-३२० या विमानाचे यशस्वी लँडिंग झाले. कनेक्टिव्हिटीला चालना देणाऱ्या जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा महाराष्ट्रात निर्माण करण्याच्या आपल्या वचनबद्धतेचे हे प्रतिबिंब आहे.

**- देवेंद्र फडणवीस**, मुख्यमंत्री

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

पुण्य नगरी मुंबई विभाग । सोमवार, ३० डिसेंबर २०२४ । मुंबई

# यशस्वी लॅण्डिंग

## नवी मुंबई विमानतळावर पहिले व्यावसायिक विमान उतरले





नवी मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळावर रविवारी पहिल्या प्रवासी व्यावसायिक विमानाचे यशस्वी लँडिंग झाले. इंडिगो ए-३२० या विमानाने मुंबई विमानतळावरून उड्डाण घेतल्यानंतर ते थेट नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर १ वाजून ३८ मिनिटांनी यशस्वीरीत्या उतरले. यशस्वी लँडिंग झाल्यानंतर विमानाला अग्निशमन दलाकडून आलेल्या दोन वॉटर कॅननच्या माध्यमातून सलामी देण्यात आली.

संबंधित वृत्त पान १० वर

# नवी मुंबई विमानतळावर पहिल्या व्यावसायिक विमानाची यशस्वी लॅण्डिंग

### वॉटर सलामी, टाळ्यांसह जल्लोष





### विमानतळाच्या निर्मितीमुळे नवी मुंबई पोलिसांची जबाबदारी वाढणार

#### ५ नवीन पोलीस ठाण्यांची निर्मिती करणार



### नवी मुंबई विमानतळाला दिबा यांचेच नाव – आ. महेश बालदी






# सकाळ

**राज्यघटना दीपस्तंभ!**
भारतीय राज्यघटना आपल्या सर्वांसाठी मार्गदर्शक दीपस्तंभ आहे, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात' या रेडिओ कार्यक्रमात केले.
वृत्त : २

• मुंबई, सोमवार, ३० डिसेंबर २०२४
किंमत ₹ ५ • आजचा अंक : पाने १४ (टुडेसह)

## नवी मुंबईत उतरले प्रवासी विमान

### लँडिंग यशस्वी; विमानतळावर जल्लोष

वाशी, ता. २९ (बातमीदार) : नवी मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळावर रविवारी (ता. २९) पहिल्या प्रवासी व्यावसायिक विमानाचे यशस्वी लँडिंग झाले. इंडिगो ए ३२० या विमानाने मुंबई विमानतळावरून टेक ऑफ करून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर दुपारी १ वाजून ३८ मिनिटांनी यशस्वी लँडिंग केले.

लँडिंगनंतर विमानावर पाणी उडवून सलामी देण्यात आली. त्यानंतर विमानतळावरील कर्मचाऱ्यांनी जल्लोष केला. वैमानिक, हवाई सुंदरी यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, अदाणी एअरपोर्टचे अरुण बन्सल, आमदार महेश बालदी आदी मान्यवर उपस्थित होते. सिडको प्राधिकरणामार्फत नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ अदाणी समूहाच्या माध्यमातून साकारण्यात येत आहे. यापूर्वी भारतीय वायुदलातर्फे ऑक्टोबर महिन्यात सी २९५ एअर क्राफ्टचे यशस्वी लँडिंग तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत करण्यात आले होते.

हा नवी मुंबईकरांसाठी ऐतिहासिक दिवस असल्याचे सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी यावेळी स्पष्ट केले. विमानतळाचे काम अत्यंत वेगाने सुरू आहे. नवी मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळामध्ये चार टर्मिनल उभारण्यात येणार असून, मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या तुलनेत दुपटीने प्रवासी वाहतूक होऊ शकणार आहे. १७ एप्रिल २०२५पर्यंत आंतरराष्ट्रीय विमानतळ सज्ज होणार असून, त्यामध्ये रनवे, टर्मिनल बिल्डिंग, लाइटिंग सिस्टीम असेल, असे विजय सिंघल म्हणाले.

### एका रनवेचे काम पूर्ण

नवी मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळावर दोन रनवे असून, त्यातील एका रनवेचे काम पूर्ण झाले आहे. दुसऱ्या रनवेचे काम दुसऱ्या टप्प्यात करण्यात येणार आहे. हे विमानतळ पाच हजार ९४५ एकर जागेवर उभारण्यात आले आहे. विमानतळाचा रनवे ३.७ किलोमीटर लांबीचा आहे. या विमानतळावर एकाच वेळी ३५० विमाने उभी राहू शकतात.

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

सोमवार, 30 दिसंबर 2024 नवभारत टाइम्स

# नवी मुंबई एयरपोर्ट पर पहला फ्लाइट वैलिडेशन टेस्ट सफल

■ **निसं, मुंबई:** नवी मुंबई इंटरनैशनल एयरपोर्ट (NMIA) ने 2025 की शुरुआत में कमर्शियल लॉन्च से पहले रविवार को पहला कमर्शियल फ्लाइट वैलिडेशन टेस्ट पूरा किया। इसके लिए इंडिगो एयरलाइन का ए320 विमान सफलतापूर्वक रनवे पर उतरा। सफल लैंडिंग के बाद NMIA की स्थापित उड़ान प्रक्रियाओं को अंतरराष्ट्रीय घोषणा के लिए इलेक्ट्रॉनिक एयरोनॉटिकल इन्फॉर्मेशन पब्लिकेशन (ईएआईपी) में प्रकाशित किया जाएगा। बता दें कि नवी मुंबई इंटरनेशनल एयरपोर्ट प्राइवेट लिमिटेड (NMIAL) नवी मुंबई में ग्रीनफील्ड इंटरनेशनल एयरपोर्ट प्रोजेक्ट के विकास, निर्माण, परिचालन और रखरखाव के लिए बनाई गई है। NMIAL अदाणी एयरपोर्ट होल्डिंग्स लिमिटेड का हिस्सा है और इसकी 74% हिस्सेदारी मुंबई इंटरनैशनल एयरपोर्ट लिमिटेड (MIAL) और 26% हिस्सेदारी सिडको के पास है। सिडको, महाराष्ट्र सरकार का उपक्रम है।

**अप्रैल, 2025 में कार्गो के लिए खोल दिया जाएगा एयरपोर्ट**

**17** अप्रैल तक एयरपोर्ट की कमर्शियल शुरुआत होगी, जबकि घरेलू उड़ानें मई के अंत तक चलेंगी।

**300** जहाज एक साथ खड़े हो सकते हैं एयरपोर्ट पर।

**1600** हेक्टेयर जमीन पर किया गया है नवी मुंबई इंटरनैशनल एयरपोर्ट (**NMIA**) का निर्माण।



@Cidco Ltd @cidco_Ltd @cidco_Ltd @CIDCO Ltd. cidco.maharashtra.gov.in

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

THE ECONOMIC TIMES | MUMBAI | MONDAY | 30 DECEMBER 2024

AIRPORT TO BE INAUGURATED ON APRIL 17

# Flight Ops from Navi Mumbai Int'l Airport May Start in May

NITIN SONAWANE



**VALIDATION FLIGHT** IndiGo aircraft lands at Navi Mumbai Int'l Airport on Sunday

**Our Bureau**

**Mumbai:** Navi Mumbai International Airport (NMIA) will be inaugurated on April 17, with domestic flights starting in late May and international operations commencing in July, Arun Bansal, CEO of Adani Airport Holdings, said on Sunday.

Initially, the airport will have a capacity to handle 8-10 million passengers a year, which will expand to 20 million by December 2025, he told reporters after an IndiGo A320 validation flight landed at NMIA at 1:32 PM. The flight, without passengers, was part of the aerodrome certification process, assessing safety, landing and take-off operations.

"The first validation flight happened today (December 29). We now need to get a formal aerodrome licence from the DGCA," Bansal said. The airport plans to apply for the aerodrome permit in February. Following the April inauguration, a four-week security and procedural review will be conducted. "This is why we are looking at the second half of May 2025 for domestic operations," Bansal said. Interestingly, Noida airport, too, is set to be inaugurated on April 17.

The validation flight will allow NMIA's procedures to be included in the global Electronic Aeronautical Information Publication (eAIP). The airport has successfully calibrated its instrument landing system (ILS) and precision approach path indicator (PAPI), ensuring safe operations during low visibility. NMIA will be the second airport serving the Mumbai Metropolitan Region (MMR), complementing the existing Chhatrapati Shivaji Maharaj International Airport (CSMIA).

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

पुढारी महामुंबई मुंबई, सोमवार, ३० डिसेंबर २०२४



नवी मुंबई : पहिल्या प्रवासी वाहतुकीच्या विमानाने लँडिंग केल्यानंतर त्याला पाण्याच्या तोफांची सलामी देण्यात आली.

# नवी मुंबई विमानतळावरून एप्रिलमध्ये पहिले टेक ऑफ

## प्रवासी वाहतूक विमानाची चाचणी यशस्वी

**नवी मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

नवी मुंबईच्या आंतरराष्ट्रीय विमानतळावर रविवारी दुपारी १ वाजून १८ मिनिटांनी प्रवासी वाहतूक विमानाचे यशस्वी लँडिंग झाले. इंडिगोचे ए-३२० हे विमान धावपट्टीवर उतरताच या विमानाला खास ऑस्ट्रेलियाहून मागवलेल्या पाण्याच्या तोफांची सलामी देण्यात आली. दरम्यान, एप्रिल २०२५ मध्ये या विमानतळावरून पहिले विमान उडेल, पहिल्या वर्षात या विमानतळावरून सुमारे ९ लाख प्रवासी प्रवास करू शकतील, अशी माहिती नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमान प्राधिकरणाच्या वतीने देण्यात आली.

इंडिगोचे विमान उतरल्यानंतर विमानतळावरील कर्मचाऱ्यांनी जल्लोष केला. वैमानिक, हवाई सुंदरी यांचे /...२

### विमानतळ मेट्रोने जोडणार



● नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर यशस्वी व्यावसायिक प्रवासी वाहतुकीचे विमान लँडिंग झाल्यानंतर हा दिवस नवी मुंबईकरांसाठी ऐतिहासिक असल्याचे सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक **विजय सिंघल** यांनी स्पष्ट केले. मुंबई, ठाणे, कल्याण आणि नवी मुंबई मेट्रोंनी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ जोडले जाणार असल्याची माहिती विजय सिंघल यांनी यावेळी दिली.

पान १ वरून

## नवी मुंबईच्या विमानतळावरून एप्रिलमध्ये पहिले टेक ऑफ!

यावेळी पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, अदानी एअरपोर्टचे सीईओ अरुण बन्सल, आमदार महेश बालदी आदी उपस्थित होते. सिडको प्राधिकरणामार्फत नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ अदानी समूहाच्या माध्यमातून साकारण्यात येत आहे.

या विमानतळावर ऑक्टोबर महिन्यात भारतीय वायुदलातर्फे काही दिवसांपूर्वी सुखोई ३० या समेच सी २९५ एअरक्राफ्टचे यशस्वी लँडिंग चाचणी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत करण्यात आले होते. मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळांच्या तुलनेत नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळामध्ये चार टर्मिनल असणार असून, मुंबई विमानतळाच्या तुलनेत दुपटीने प्रवासी वाहतूक होऊ शकणार आहे.

१७ एप्रिल २०२५ पर्यंत आंतरराष्ट्रीय विमानतळ सज्ज होणार असून त्यामध्ये रनवे, टर्मिनल बिल्डींग, लाईटिंग सिस्टम ही पूर्ण होणार असल्याचे विजय सिंघल म्हणाले. पूर्ण क्षमतेने कार्यान्वित झाल्यानंतर या विमानतळावरून नऊ कोटी प्रवासी दरवर्षी प्रवास करू शकतील.

या विमानतळावर दोन रन वे आहेत. त्यातील एक रन वे चे काम पूर्ण झाले असून दुसऱ्या रनवेचे काम दुसऱ्या टप्प्यात करण्यात येणार आहे. हा विमानतळ ५ हजार ९४५ एकर जागेवर उभारण्यात आला असून या धावपट्टी ३.७ किलोमीटरची आहे. या विमानतळावर एकाचवेळी ३५० विमान उभी राहू शकतात. हैदराबाद येथील राजीव गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळानंतर नवी मुंबईतील विमानतळ हा देशातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा विमानतळ असणार आहे.

या विमानतळावर देशातील सर्वात मोठी कार्गो प्रणाली तयार करण्यात आली असून, मुंबईपासून ४० किलोमीटर अंतरावर हे विमानतळ सज्ज करण्यात आले आहे.

नवी मुंबई विमानतळावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांसाठी पहिल्या दिवसापासून अत्याधुनिक सोईसुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. विमानांच्या उपलब्धतेसाठी विविध विमान कंपन्यांशी बोलणी सुरू आहेत, अशी माहिती अदाणी एअरपोर्टचे सीईओ अरुण बन्सल यांनी दिली.

टर्मिनल १ वरून दरवर्षी सुमारे २ कोटी प्रवासी प्रवास करतील तर टर्मिनल २ चे काम सुरू असून, या टर्मिनलवरून अधिक प्रवासी प्रवास करू शकतील. २०२८-२९ या आर्थिक वर्षाअखेरीस हे विमानतळ पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होईल, अशी माहितीही अरुण बन्सल यांनी दिली.



CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

mid-day Monday, December 30, 2024 | Mumbai

# Historic first landing at Navi Mumbai airport

IndiGo Airbus A320 touches down on RW26, marking a key milestone ahead of the airport's opening in 2025



The Airbus A320 aircraft at Navi Mumbai International Airport. PIC/NIMESH DAVE

**PRASUN CHOUDHARI**
prasun.choudhari@mid-day.com

THE Navi Mumbai International Airport (NMIA) witnessed its most anticipated first commercial landing on the southern runway (RW26) with an IndiGo airline Airbus A320 aircraft on Sunday. "We conducted the commercial landing to ensure that we are ready to land and take off aircraft from the runway and make the airport operational by the stipulated date of completion," said Airport Authority of India (AAI) officials.

The official also disclosed, "The test was conducted by us (AAI) in coordination with Air Traffic Controllers (ATC), NMAI, CIDCO."

The IndiGo A320 departed from Mumbai Airport at 12.23 pm and landed NMIA around 2.00 pm. On board were DGCA officials and the IndiGo crew. The pilots performed at least three go-arounds (landing abort procedures) before successfully landing the aircraft on the runway.

The aircraft received a traditional water salute from two Crash Fire Tenders (CFT). Senior representatives from DGCA, AAI, Customs, Immigration, Central Industrial Security Force (CISF), CIDCO, IMD, Bureau of Civil Aviation Security (BCAS), and Adani Airport Holdings Ltd (AAHL) were present among the many gathered to witness this milestone. A bystander said, "This is a historic occasion. We are lucky enough to witness this landing. We hope that the airport becomes operational soon so that the people residing here do not have to travel all the way to Mumbai to catch a flight."

> 'We conducted the commercial landing to ensure that we are ready to land and take off aircraft from the runway and make the airport operational by the stipulated date of completion' The AAI officials

Another AAI official told **mid-day**, "Once the commercial operations start here (NMAI), the air traffic congestion at Mumbai airport will be relieved. This is a big relief for Mumbai airport and even for the airlines, as the reduction in air traffic congestion will also mean improved on-time performance, which will benefit the passengers."

This development came a fortnight after AAI had successfully conducted Precision Approach Path Indicator (PAPI) validation at the airport. On December 12, AAI conducted PAPI system validation, which is crucial for guiding pilots during landing. The system was validated by AAI's Flight Inspection Unit (FIU).

"This system uses a series of lights perpendicular to the runway, emitting red and white signals to help pilots maintain the correct glide path, which is essential to bring the aircraft to the runway threshold for landing. The validation process is essential for pilot safety and involves trials and analysis under both day and night conditions," said sources from AAI FIU.

Previously, on October 11, an Indian Air Force (IAF) C295 aircraft successfully conducted the first test landing at NMAI. This was followed by a fly-past of the IAF Sukhoi SU30, which included a two-round left-hand circuit pattern sortie (two rounds in an anticlockwise direction over the airport), after which the Sukhoi SU30 returned to Pune Air Force Base.

*www.freepressjournal.in*
Mumbai, Monday, December 30, 2024

# NAVI MUMBAI GETS WINGS

**Ajay Awtaney**
NAVI MUMBAI

FPJ SPECIAL

The touchdown of the first commercial flight at the Navi Mumbai International Airport (NMIA) on Sunday marks a pivotal moment for the Mumbai Metropolitan Region (MMR). This achievement, following a successful validation flight, represents a key milestone toward the airport's full-scale operation, slated for inauguration on April 17, 2025.

Developed at a cost of Rs 18,000 crore, the new airport is set to significantly alleviate congestion at the already overcrowded Chhatrapati Shivaji Maharaj International Airport (CSMIA), which has been operating at full capacity, handling 52.8 million passengers this fiscal year alone.

NMIA is poised to play a critical role in boosting regional connectivity and economic growth, easing the pressure on the city's sole international gateway while strengthening Mumbai's position as a global hub.

Vijay Singhal, Managing Director of CIDCO, emphasized the importance of this milestone, stating, "The successful landing of a commercial flight today not only underscores the readiness of NMIA's infrastructure but also marks a major step toward operationalization. This airport is not just a transportation hub; it's a key enabler for the region's growth."

As a public-private partnership between Adani Airports Holdings Limited and CIDCO, NMIA promises to be a catalyst for the local economy.

▸ **Contd on** | nation

## Navi Mumbai...

The airport is expected to create thousands of jobs and stimulate substantial growth in surrounding areas like Panvel and Kharghar, driving real estate development and infrastructure projects.

The first commercial flight, an IndiGo A320, showcased the airport's preparedness for operations. The successful flight test has brought the airport one step closer to securing its aerodrome permit, expected by February 6, 2025. Domestic operations are anticipated to commence in May 2025.

The first phase of NMIA's Terminal 1, capable of handling 20 million passengers annually, is nearing completion. Expansion will continue with Terminal 2, slated for construction from July 2025, which will add capacity for an additional 30 million passengers. By 2029, the airport is expected to accommodate 50 million passengers annually, with the full network of four terminals ultimately handling up to 90 million passengers per year.

This new airport is a crucial addition to the Mumbai Metropolitan Region, where passenger traffic currently stands at 65 million. The addition of NMIA will allow the region to meet rising demand, offering a seamless travel experience for passengers who might otherwise need to travel to other airports.

Beyond passenger services, NMIA will boast two parallel runways, parking for 350 aircraft, and a cargo terminal capable of handling 2.6 million tonnes of goods annually. The airport's catchment area spans Navi Mumbai, Raigad, and Pune, with plans to connect the two major airports in the region via road, rail, and metro systems, ensuring a seamless travel experience for passengers.

As the countdown to its full operational launch begins, NMIA is set to reshape the future of air travel and economic development in the MMR, ushering in a new era of connectivity for the region.



CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

★ मुंबई, सोमवार, ३० डिसेंबर २०२४
लोकसत्ता
WWW.LOKSATTA.COM

# नवी मुंबई विमानतळावर पहिले व्यावसायिक विमान 'लँड'



नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर रविवारी प्रथमच व्यावसायिक विमान यशस्वीरित्या उतरले. 'इंडिगो' कंपनीच्या या विमानाने धावपट्टीला स्पर्श करताच प्रथेप्रमाणे त्याला दोन्ही बाजूंनी पाण्याचे फवारे मारून मानवंदना (वॉटर सॅल्यूट) देण्यात आली. छाया : नरेंद्र वास्कर

लोकसत्ता प्रतिनिधी

> छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळापेक्षा या विमानतळाची क्षमता दुप्पट असेल. पहिल्या टप्प्यात वर्षाला २ कोटी प्रवासी वाहतुकीची क्षमता असेल. टर्मिनल इमारतीचे ८४ टक्के काम पूर्ण झाले असून धावपट्टी टर्मिनल स्वयंचलित यंत्रणेद्वारे एकमेकांना जोडले आहेत. आजच्या चाचणीनंतर आता विमानतळ सुरू करण्यासाठी परवानगी मागितली जाईल. त्यानंतरही विविध चाचण्या होतील. - विजय सिंघल, व्यवस्थापकीय संचालक, 'सिडको'

**नवी मुंबई :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या धावपट्टीवर रविवारी पहिल्यांदाच व्यावसायिक विमान यशस्वीरित्या उतरविण्यात आले. ही यशस्वी चाचणी म्हणजे विमानतळ सुरू होण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल मानले जात असून १७ एप्रिल २०२५पासून विमानतळावरून प्रवासी तसेच मालवाहतूक सुरू करण्याचा मानस 'सिडको'चे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी बोलून दाखवला.

नवी मुंबई विमानतळावरील दोन धावपट्ट्यांपैकी एकीच्या विविध चाचण्या यापूर्वी पार पडल्या आहेत. रविवारी दुपारी १ वाजून ३९ मिनिटांनी धावपट्टीवर इंडिगो कंपनीचे 'ए - ३२०' विमान यशस्वीरित्या उतरले. नागरी हवाई वाहतुकीचे महासंचालक तसेच विविध तंत्रज्ञ, कर्मचाऱ्यांनीही चाचणीदरम्यान विमानातून प्रवास केला. विमानाचे स्वागत करण्यासाठी सिंघल यांच्यासह सह व्यवस्थापकीय *(पान ५ वर)*

## नवी मुंबई विमानतळावर पहिले व्यावसायिक विमान 'लँड'

*(पान १ वरून)*

संचालक शंतनू गोयल, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्राधिकरणाचे जे.के. शर्मा, प्रभात महापात्रा, मिनल वैद्य, आमदार महेश बालदी हे उपस्थित होते. ऑस्ट्रेलियन बनावटीच्या दोन अग्निशमन बंबांनी कंपनीला पाण्याचे फवारे उंचावून सलामी दिली.

सिडको आणि एनएमआयएल कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी वैमानिक आणि अन्य कर्मचाऱ्यांचे पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले.

विमानासमोर विधिवत पूजाअर्चाही करण्यात आली. या क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी एनएमआयएल कंपनीचे काही निवडक कर्मचारी व अधिकारी उपस्थित होते.

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

लोकमत

# मेट्रो धावली, धावपट्टीवर उतरले विमान!

## मावळत्या वर्षात सिडकोचे पुढचे पाऊल; अनेक महत्त्वाकांक्षी प्रकल्प दृष्टिपथात

कमलाकर कांबळे
लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी मुंबई :** सिडकोच्या माध्यमातून सुरू असलेले मात्र विविध कारणांमुळे रखडलेले काही महत्त्वाकांक्षी प्रकल्प सरत्या वर्षात दृष्टिपथात आले आहेत. यापैकी दीर्घकाळ रखडलेला नवी मुंबई मेट्रोचा बेलापूर ते पेंधर दरम्यानचा पहिला टप्पा याच वर्षाच्या जानेवारी महिन्यात प्रवाशांसाठी खुला झाला, तर नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पहिल्या टप्प्याच्या दृष्टीनेही सरत्या वर्षात अनेक अत्यावश्यक चाचण्या यशस्वीरीत्या पार पडल्या. सुखोई लढाऊ विमानाची यशस्वी चाचणी झाली. त्यानंतर रविवारी इंडिगोचे प्रवासी विमान विमानतळावर उतरले. सर्वसामान्य घटकांसाठी आतापर्यंतची सर्वात मोठी म्हणजेच तब्बल २६ हजार घरांची महागृहनिर्माण योजना याच सरत्या वर्षात जाहीर करण्यात आली आहे.

शहर निर्मितीचा प्रदीर्घ अनुभव असलेल्या सिडको महामंडळाच्या माध्यमातून सध्या नैना, कॉर्पोरेट पार्क, मेट्रोचा विस्तार, पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत ६७ हजार घरांची महायोजना, खारघर ते नेरूळ आणि अटल सेतू ते आम्र मार्ग दरम्यान कोस्टल रोड, तुर्भे-खारघर लिंक रोड, नेरूळ जेट्टीवरून मुंबई दरम्यान जलवाहतूक सेवा, आदी लाखो कोटींची कामे प्रस्तावित आहेत. त्यापैकी काही मोजक्याच प्रकल्पांना निर्णायक दिशा मिळाली, तर काही प्रकल्प आजही लालफितीच्या विळख्यात सापडले आहेत.

अलविदा २४.

### रखडलेले प्रकल्प

१ मुंबई ते नवी मुंबईदरम्यान जलवाहतूक सेवा सुरू करण्यासाठी सिडकोने नेरूळ येथे सुमारे १११ कोटी रुपये खर्चून सुसज्ज जेट्टी बांधली आहे. परंतु, मागील अडीच वर्षांपासून ही जेट्टी धूळ खात पडून आहे.

२ **खासदार, आमदारांस भारतीय प्रशासकीय सेवेतील उच्चपदस्थ अधिकारी आणि न्यायाधीशांसाठी सीबीडी बेलापूर येथे ३५० घरांची महानिवास योजना जाहीर केली. त्यासाठी जवळपास ५५० व्हीआयपींनी नोंदणी केली. मात्र, हा प्रकल्पसुद्धा गेल्या वर्षभरापासून कागदावरच आहे.**

३ गेल्या बारा वर्षांपासून रखडलेला घणसोली-ऐरोली पामबीच्या खाडीवरून सुरू असलेला वाद सरत्या वर्षात संपला. सिडकोने पन्नास टक्के खर्च उचलण्याची तयारी दर्शविली आहे. मात्र, निवडणुकांच्या रणधुमाळीत हा प्रकल्पसुद्धा रखडला आहे.

### वादग्रस्त निर्णय

- **ऐरोलीतील भूखंड खासगी विकासकाला देण्याचा संचालक मंडळाचा निर्णय**
- मनुष्यबळ पुरवठा करणाऱ्या बाह्य एजन्सीकडून ३०० कर्मचाऱ्यांच्या पीएफची रक्कम न भरल्याची घटना
- **उरणमध्ये बिलक्कर कुटुंबीयांना १२.५ टक्के योजनेंतर्गत वाटप केलेल्या भूखंडाचे प्रकरण**
- आयएस नसतानाही दोघांची सह व्यवस्थापकीय संचालकपदी नियुक्ती



### सिडकोच्या अधिकारावर घाला

- **शिवडी-न्हावा शेवा सागरी सेतू अर्थात एमटीएचएल हा मार्ग नवी मुंबईतील ज्या भागात संपतो, त्याच परिसरात तिसरी नवी मुंबई साकारण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.**
- एमएमआरडीएला नवनगर विकास प्राधिकरण अर्थात न्यू टाउन डेव्हलपमेंट ॲथॉरिटी (एनटीडीए) म्हणून विशेष अधिकार बहाल केले आहेत. त्यामुळे नैना क्षेत्रातील काही गावांसह १२३ गावांच्या विकासाचे सिडकोचे अधिकार संपुष्टात आले आहेत.

### अतिरिक्त जबाबदारीही कागदावरच

- महाराष्ट्राच्या पश्चिम किनारपट्टीवरील पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या किनारपट्टी जिल्ह्यांसाठी शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ (सिडको)ची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्यात आली.
- **त्यासाठी मुंबई महापालिकेचे माजी आयुक्त सुबोधकुमार यांच्या अधिपत्याखाली उच्चस्तरीय तज्ज्ञ सल्लागार मंडळ नियुक्त करण्यात आले. तसेच नगररचना तज्ज्ञ म्हणून राज्याच्या नगररचना विभागाचे संचालक अविनाश पाटील यांचीही नेमणूक करण्यात आली. मात्र, मागील वर्षभरापासून हा प्रकल्पसुद्धा कागदावरच आहे.**




### विजय सिंघल यांची कामगिरी

१ अगदी प्रतिकूल परिस्थितीत दहा महिन्यांपूर्वी सिडकोच्या व्यवस्थापकीय संचालकपदी रुजू झालेले विजय सिंघल यांनी रखडलेल्या प्रकल्पांना गती देण्याचा प्रयत्न केला.

२ विशेषतः आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या कामाला गती, पंतप्रधान आवास योजनेची अंमलबजावणी, त्या अंतर्गत २६ हजार घरांची योजना, नैना प्रकल्पातील पायाभूत सुविधांच्या कामांना प्राधान्य, खारकोपर ते उरणदरम्यान लोकल सेवेचा शुभारंभ, आदी महत्त्वाकांक्षी प्रकल्पांना गती देण्यात सिंघल यांना यश प्राप्त झाले.

Hello Navi Mumbai
Page No. 1 Dec 30, 2024
Powered by: erelego.com

@Cidco Ltd @cidco_Ltd @cidco_Ltd @CIDCO Ltd. cidco.maharashtra.gov.in

CIDCO
WE MAKE CITIES
NEWS

नवशक्ति सोमवार ▲ ३० डिसेंबर २०२४

# नवी मुंबई विमानतळ उड्डाणासाठी सज्ज, १७ एप्रिलला उद्घाटन

**नवी मुंबई :** मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरील ताण कमी करण्यासाठी आणि नवी मुंबईच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे असलेले नवी मुंबई विमानतळ आता लोकांना सेवा देण्यासाठी सज्ज झाले आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे (एनएमआयए) उद्घाटन १७ एप्रिल २०२५ रोजी केले जाणार असून मे २०२५ पासून उड्डाणांना सुरुवात होणार आहे. अदानी एअरपोर्ट होल्डिंग लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी अरुण बन्सल यांनी रविवारी याबाबतची माहिती दिली. रविवारी नवी मुंबई विमानतळावर पहिले व्यावसायिक विमान यशस्वीपणे उतरवण्यात आले.

मुंबई विमानतळावरून सुटलेले इंडिगो एअरलाईन्सचे 'ए३२०' विमान रविवारी दुपारी १.४० वाजता नवी मुंबई विमानतळावर लँड झाले. त्यामुळे आता नवी मुंबई विमानतळावरून लवकरच सेवा सुरू करण्यासाठी गेल्या काही महिन्यांपासून वेगाने काम सुरू आहे. नवी मुंबई विमानतळावरून व्यावसायिक सेवांना मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापासून सुरुवात होणार आहे, तर या विमानतळाचे उद्घाटन १७ एप्रिलला करण्याचा विचार आहे. "उद्घाटन झाल्यानंतर आम्ही प्रवाशांच्या सेवेसाठी सज्ज असू. एरोड्रोमच्या परवान्यासाठी आम्ही ६ फेब्रुवारी रोजी अर्ज करणार आहोत. ३० दिवसांच्या आत आम्हाला ही परवानगी मिळू शकते," असे बन्सल यांनी सांगितले.

"देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय उड्डाणे घेणाऱ्या महत्त्वाच्या एअरलाईन्सशी आम्ही चर्चा करत असून प्रवाशांना उत्कृष्ट सुविधा देण्याचे आमचे ध्येय आहे. अतिरिक्त प्रवाशांचा भार पेलण्यासाठी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्व सुविधांनी युक्त आहे. त्यामुळे मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरील ताण कमी होईल," असेही बन्सल यांनी सांगितले.

नवीन विमानतळावर आधुनिक सोयीसुविधा उपलब्ध करण्यात आल्या असून प्रवाशांसाठी हे विमानतळ आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरणार आहे. "प्रवाशांचा आनंद द्विगुणित करण्यासाठी आम्ही उच्च दर्जाच्या सुविधा उभारल्या आहेत. त्यामुळे उड्डाण घेण्यासाठी प्रवाशांची रीघ लागेल," असे ते म्हणाले. (संभिता पालकर)




## नवी मुंबई विमानतळाविषयी

- दरवर्षी २० दशलक्ष प्रवाशांना हाताळण्याची क्षमता
- मार्च २००८ मध्ये विमानतळाच्या उभारणीस प्रारंभ
- जुलै २०२५ पासून आंतरराष्ट्रीय उड्डाणांना सुरुवात
- रोजच्या वर्गी उड्डाणे घेण्यासाठी चर्चा सुरू
- दरवर्षी २.५ दशलक्ष टन कार्गो वाहतूक होणार
- मुंबई महानगर प्रदेशातील दुसरे आंतरराष्ट्रीय विमानतळ

## नवी मुंबई विमानतळ उड्डाणासाठी सज्ज, १७ एप्रिलला उद्घाटन

उपस्थित नसी आम्हाला कोणतीच अडचण येणार नाही," असेही त्यांनी सांगितले.

रविवारी नवी मुंबई विमानतळाच्या उत्तर प्रवेशद्वारावरून व्यावसायिक विमान उतरवण्यात आले, त्यावेळी उरणचे आमदार महेश बालदी, सिडकोचे उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय एअरपोर्ट लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी बेरटन बौबोजेके शर्मा तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते. यावेळी सिंघल म्हणाले की, "मुंबई आणि नवी मुंबई विमानतळामधील अंतर हे फक्त ३५ किलोमीटरचे असल्यामुळे मुंबईच्या रहिवाशांसाठी नवी मुंबई विमानतळावरून प्रवास करण्यासाठी आम्ही सोयीसुविधा उभारत आहोत.

नवी मुंबई विमानतळावर ११ ऑक्टोबर २०२४ रोजी भारतीय वायु दलाचे सी-२९५ या विमानाची यशस्वी चाचणी घेण्यात आली होती. वायुदलाच्या अनुभवी चालकांनी ही मोहीम यशस्वीपणे राबवली होती. आता रविवारी मुंबई ते नवी मुंबई या मोजक्या अंतराचे यशस्वी लँडिंग या विमानतळावर करण्यात आले. यापूर्वी नवी मुंबई ते पुणे इतक्या छोट्या अंतराचा प्रवास करण्यात आला होता.

# NEWS

सोमवार, दि. ३० डिसेंबर २०२४ **सामना**

# लँडिंग झाले... मेपासून नवी मुंबईतून टेक ऑफ





## १७ एप्रिलला होणार आंतरराष्ट्रीय विमानतळाचे उद्घाटन

नवी मुंबई, दि. २९ (प्रतिनिधी) - नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर इंडिगो ए ३२० या व्यावसायिक प्रवासी विमानाचे आज यशस्वी लँडिंग झाले. मुंबई येथील छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळावरून दुपारी १२ वाजून ३२ मिनिटांनी उड्डाण केलेले हे विमान नवी मुंबई विमानतळावर १ वाजून १८ मिनिटांनी उतरले आणि उपस्थितांनी जल्लोष केला.

[illegible]

पान ८

### दुसऱ्या धावपट्टीचे काम अडीच वर्षानंतर

[illegible]

### पाण्याच्या फवाऱ्याची सलामी, टाळ्यांचा कडकडाट आणि जल्लोष

[illegible]

## मेपासून नवी मुंबईतून टेक ऑफ

(पान १ वरून) [illegible]

### दक्षिण धावपट्टी सक्षम

[illegible]

### दररोज अडीचशे विमानांचे उड्डाण

[illegible]

### रखडलेला प्रकल्प सहा वर्षांत मार्गी लागला

[illegible]

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS





## विमानोड्डाणासाठी सज्जता...

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर रविवारी व्यावसायिक विमानाची यशस्वी चाचणी झाली. 'इंडिगो'चे प्रवासी विमान धावपट्टीवर उतरले आणि विमानतळ सज्जतेतील महत्त्वाचा टप्पा पार झाला. येत्या १७ एप्रिल रोजी या विमानतळावरून पहिले उड्डाण करण्याचा निर्धार अदानी समूहाचे अधिकारी आणि सिडकोने केला आहे. यामुळे या विमानतळावरून विमानोड्डाणाची दोन दशकांची प्रतीक्षा आता लवकरच संपणार आहे. पान...३

# १७ एप्रिलला विमानोड्डाण?

## एमएमआयएएलचा दावा; नवी मुंबईत उतरले पहिले व्यावसायिक विमान

- पंतप्रधानांच्या उपस्थितीत उडणार पहिले विमान
- देशातील सर्वात मोठा ग्रीनफिल्ड विमानतळ दृष्टिपथात

म. टा. वृत्तसेवा, नवी मुंबई



### उड्डाणाच्या दाव्याबाबत संभ्रम

### नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाची प्रमुख वैशिष्ट्ये

- एकूण क्षेत्रफळ ११६० हेक्टर
- प्रतिवर्ष प्रवासी वाहतूक क्षमता - ९० दशलक्ष प्रवासी प्रतिवर्ष
- प्रतिवर्ष एकूण विमानांचे परिचालन (मालवाहू विमानांसह) - ४,७९,०००
- गर्दीच्या वेळेतील एकूण विमान वाहतूक - १३,३००
- प्रतिवर्ष एकूण मालवाहू क्षमता (टन) १.५ दशलक्ष
- दोन समांतर धावपट्ट्यांसह दोन टॅक्सी वे



### नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाची परिवहन जोडणी

- वर्तमानातील परिवहन जोडणी
- शीव-पनवेल द्रुतगती महामार्ग
- राष्ट्रीय महामार्ग ४ (मुंबई पुणे महामार्ग)
- मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग
- आम्र मार्ग
- पाम बीच मार्ग
- ठाणे-बेलापूर मार्ग

### वर्तमानातील रस्ते जोडणी

- नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ ते मानखुर्द-नेरूळ जोड मार्ग आणि पश्चिम उपनगरांदरम्यान जोडणी
- पूर्व मुक्त मार्ग
- नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि दक्षिण मुंबईदरम्यान जोडणी



### प्रस्तावित परिवहन जोडणी

- शीव-पनवेल द्रुतगती महामार्ग विस्तारीकरण
- राष्ट्रीय महामार्ग ४ब, आम्र मार्ग आणि राज्य महामार्ग-५४ यांचे अभिसरण
- छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ मेट्रो जोडणी
- नेरूळ जलवाहतूक टर्मिनल
- मुंबई ट्रान्स हार्बर लिंक
- एमटीएचएल ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ किनारी मार्ग

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

नवाकाळ
Mumbai Edition
Dec 30, 2024 Page No. 1

# नवी मुंबईच्या विमानतळावर पहिले प्रवासी विमान उतरले

**१७ एप्रिल २०२५ रोजी उद्घाटन होणार**

■ नवी मुंबई

**नवी मुंबई** विमानतळावर आज पहिले प्रवासी विमानाचे यशस्वी लँडिग झाले आहे. इंडिगोचे ए-३२० विमान दुपारी आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरले. महिनाभरापूर्वी वायुदलाच्या सी-२९५ आणि सुखोई-३० या विमानांचे येथे लँडिंग झाले होते. या विमानतळाचे १७ एप्रिल २०२५ रोजी उद्घाटन होणार असल्याची माहिती सीईओ बी.व्ही.जेके शर्मा यांनी दिली आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर आज दुपारी एक वाजता विमानतळ सुरक्षा प्राधिकरणाच्या परीक्षण अधिकाऱ्यांना इंडिगो एअरलाईन्सचे प्रवासी विमान नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या यशस्वीरित्या उतरले. यावेळी सिडको आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे अधिकारी विमानतळावर उपस्थित होते. विमान



धावपट्टीवर उतरताच विमानतळावरील उपस्थितांनी टाळ्या वाजवून आनंद व्यक्त केला. विमानाच्या लँडींग वेळी अग्निशमन दलाकडून पहिल्या विमानास दोन्ही बाजूंनी पाण्याची फवारणी मारून पान ७ वर

## नवी मुंबई विमानतळावर पहिले प्रवासी विमान उतरले

[illegible]

@Cidco Ltd @cidco_Ltd @cidco_Ltd @CIDCO Ltd. cidco.maharashtra.gov.in

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

**आपलं महानगर** सोमवार ३० डिसेंबर २०२४

# मुंबई, नवी मुंबई विमानतळ मेट्रोने जोडणार

## सिडकोचा निर्णय, नागरिकांसाठी हायस्पीड प्रवास

प्रतिनिधी । आपलं महानगर वृत्तसेवा



**मुंबई ।** मुंबई विमानतळ ते नवी मुंबई विमानतळ मेट्रोने जोडणार असल्याची माहिती सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी दिली. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळास मुंबई, ठाणे, कल्याण, डोंबिवली या शहरातील मेट्रो थेट जोडल्या जाणार आहेत. तसेच मुंबईतील समुद्र आणि खाड्यांचा वापर करून जल वाहतुकीने विमानतळ जोडणार आहे.

राज्यात पायाभूत सुविधांच्या निर्मितीला मोठ्या प्रमाणात चालना देण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर रस्ते, जल, हवाई मार्गाचे बळकटीकरण करण्यात येत आहे. राज्याचा प्रत्येक भाग विमानाने जोडण्यासह अस्तित्वातील विमानतळांचे विस्तारीकरण करण्याच्या कामाला गती देण्यात येत आहे. मुंबई विमानतळावर एक रनवे, मात्र नवी मुंबई विमानतळावर दोन रन वे असल्याने दुप्पट क्षमता आहे. विमानतळावर चार टर्मिनल असून चारही टर्मिनल अंतर्गत जोडणार. जेणेकरून कोणत्याही टर्मिनलमधून आत आलेला प्रवासी इच्छित ठिकाणी पोचणार. हल्ली मुंबई विमानतळावर बाहेर जावून खाजगी वाहन पकडून दुसऱ्या टर्मिनलवर जावे लागत असल्याने भविष्यात ही समस्या दूर होणार आहे. किंबहुना यात सोलरचा मोठ्या प्रमाणात वापर करण्यात येणार असल्याची माहितीही विजय सिंघल यांनी दिली.

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

प्रहार मुंबई ● सोमवार, ३० डिसेंबर २०२४

नवीन वर्षाचे खास गिफ्ट!

# नवी मुंबई विमानतळावर पहिल्या व्यावसायिक विमानाचे यशस्वी लँडींग

## १७ एप्रिल २०२५ मध्ये पहिले प्रवासी आणि कार्गो विमान होणार सुरू

◆ **नवी मुंबई (प्रतिनिधी):**



नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर रविवारी पहिली व्यावसायिक उड्डाण प्रमाणीकरण चाचणी रविवारी दुपारी यशस्वीरीत्या पार पडली. इंडिगो एअरलाइन्सचे ए ३२० विमान धावपट्टीवर उतरले. यामुळे आता विमानतळ पूर्णपणे कार्यान्वित होण्याच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. पुढील वर्षात नवी मुंबईकरांना हक्काचं विमानतळ मिळणार आहे. नव्या वर्षात १७ एप्रिल २०२५ मध्ये पहिले प्रवासी आणि कार्गो विमान सुरू होणार असल्याची माहिती सूत्रांकडून देण्यात आली. विमान धावपट्टीवर आल्यानंतर दोन क्रॅश फायर टेंडर्स (सीएफटी)द्वारे पारंपारिक वॉटर सॅल्यूटने स्वागत केले. नागरी विमान वाहतूक महासंचालनालय, भारतीय विमानतळ प्राधिकरण आणि इतर प्रमुख एजन्सींसह भारताच्या विमान वाहतूक क्षेत्रातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. मिळालेल्या माहितीनुसार, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे काम ३१ मार्च २०२५ पर्यंत पूर्ण होईल. नंतर हे विमानतळ कार्यन्वित होणार आहे. या विमानातून एका वर्षाला ९ कोटींहून अधिक प्रवासी प्रवास करतील अशी माहिती असून, विमानतळाच्या टर्मिनल इमारतीचे काम अंतिम टप्प्यात आहे.

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

मुंबई, सोमवार, ३० डिसेंबर २०२४ तरुण भारत
www.mahamtb.com

# नवी मुंबई विमानतळावर पहिली उड्डाण प्रमाणीकरण चाचणी यशस्वी

◆'इंडिगो' एअरलाईन्सचे 'ए३२०' विमान उतरले ◆ पारंपरिक वॉटर सॅल्यूटने स्वागत

**मुंबई, दि. २९ : प्रतिनिधी**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर रविवार, दि. २९ डिसेंबर रोजी पहिली व्यावसायिक उड्डाण प्रमाणीकरण चाचणी यशस्वीरित्या पार पडली. यामुळे आता विमानतळ पूर्णपणे कार्यान्वित होण्याच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे.

'इंडिगो' एअरलाईन्सचे 'ए३२०' विमान धावपट्टीवर उतरले. दोन 'क्रॅश फायर टेंडर्स' (सीएफटी)द्वारे पारंपरिक वॉटर सॅल्यूटने स्वागत केले. 'नागरी विमान वाहतूक महासंचालनालय' (डीजीसीए), 'भारतीय विमानतळ प्राधिकरण' आणि इतर प्रमुख एजन्सींसह भारताच्या विमान वाहतूक क्षेत्रातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. (पान ६ वर)»

## महाराष्ट्रासाठी अभिमानास्पद क्षण!

"नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर पहिली व्यावसायिक विमान उड्डाण मान्यता चाचणी यशस्वीपणे पार पडली, हा समस्त महाराष्ट्रासाठी अभिमानास्पद क्षण आहे! इंडिगो ए३२० या पहिल्या व्यावसायिक विमानाचे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर यशस्वी लँडिंग झाले. यावेळी यशस्वी चाचणीबद्दल विमानाला वॉटर कॅननची सलामीही देण्यात आली. विकास आणि कनेक्टिव्हिटिला चालना देणाऱ्या जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा महाराष्ट्रात निर्माण करण्याच्या आपल्या वचनबद्धतेचे हे प्रतिबिंब आहे.

**- देवेंद्र फडणवीस**, मुख्यमंत्री



पान १ वरुन...

## नवी मुंबई विमानतळावर पहिली उड्डाण प्रमाणीकरण चाचणी यशस्वी

'अदानी एअरपोर्ट होल्डिंग्ज लिमिटेड'चे मुख्य कार्यकारी अधिकारी अरुण बन्सल म्हणाले की, ''नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी हा महत्त्वाचा दिवस आहे. प्रमाणीकरण उड्डाण यशस्वीपणे पूर्ण करणे हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. आम्ही आता प्रत्येक टप्प्यावर सुरक्षिततेला प्राधान्य देत विमानतळ कार्यान्वित करण्याच्या एक पाऊल जवळ आलो आहोत. एनएमआयए केवळ जागतिक दर्जाच्या विमान वाहतूक सुविधाच देणार आहेच. त्याचबरोबर, ते या क्षेत्राचा सर्वांगीण विकास करण्यास सक्षम करणार आहे.'' प्रमाणीकरण फ्लाईटमध्ये लॅण्डिंग आणि टेक-ऑफ मॅन्युव्हर्सचे तांत्रिक मूल्यांकनदेखील समाविष्ट होते. ही चाचणी यशस्वीरित्या पार पडल्याने आता आंतरराष्ट्रीय विमानचालन मानकांचे पालन सुनिश्चित होते. 'डीजीसीए'च्या पुनरावलोकनानंतर, 'एनएमआयए'च्या उड्डाण प्रक्रिया 'इलेक्ट्रॉनिक एरोनॉटिकल इन्फॉर्मेशन पब्लिकेशन'मध्ये प्रकाशित केल्या जाणार आहेत.



नवराष्ट्र | मुंबई, ३० डिसेंबर २०२४ — महामुंबई

## नवी मुंबई विमानतळावर पहिले यशस्वी लँडिंग



- **५,९४५** एकर जागेवर विमानतळ
- **३५०** विमाने एकावेळी उभी राहणे शक्य
- **३.७** किमी एवढी लांबीची धावपट्टी
- **०९** लाख प्रवासी वर्षाकाठी प्रवास करतील
- **६०** लाख प्रवासी क्षमता काम पूर्ण झाल्यावर

मुंबई. मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरील भार कमी करण्यासाठी नवी मुंबईत उभारण्यात आलेल्या विमानतळावर रविवारी दुपारी दीड वाजता पहिले व्यावसायिक विमान इंडिगो ए-३२०चे यशस्वी लँडिंग करण्यात आले. महिनाभरापूर्वीच्या चाचणीनंतरचे हे पहिलेच व्यावसायिक लँडिंग होते. यशस्वी लँडिंगनंतर विमानाला पाण्याची सलामी देण्यात आली. मुंबईपासून ४० किमीवर पनवेलजवळ हे विमानतळ आहे. येत्या मार्चपासून ते कार्यान्वीत होणार आहे.

### देशातील दुसरे मोठे विमानतळ

हैदराबादच्या राजीव गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळानंतर नवी मुंबईतील हे विमानतळ देशातील दुसरे सर्वात मोठे विमानतळ आहे. सिडको आणि जीव्हीके कंपनीने एकत्र येत हे विमानतळ बांधले आहे.

## नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमातळावर इंडिगो ए-३२० चे यशस्वी लँडिंग

# पहिले टेक ऑफ १७ एप्रिलला

पनवेल, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे काम पूर्णत्वास येत असून, ऑक्टोबरमध्ये येथे भारतीय वायुदलाच्या विमानाने यशस्वी लँडिंग केले होते. त्यानंतर रविवारी प्रवासी वाहतूक विमान इंडिगो ए-३२० चे यशस्वी लँडिंग झाले असून, १७ एप्रिलला पहिले टेक ऑफ होणार आहे. डोमेस्टिक आणि कार्गो विमानांचे उड्डाण होणार असून, लवकरच येथून प्रत्यक्षात प्रवासी वाहतूकही सुरू होणार आहे.

भारतीय विमान वाहतूक क्षेत्रातील नियामकांच्या उपस्थितीत नवी मुंबई विमानतळावर पहिल्या व्यावसायिक उड्डाण प्रमाणीकरण चाचणीसह कार्यान्वित होण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. इंडिगो विमानाचे लँडिंग हा आंतरराष्ट्रीय विमानतळ कार्यान्वित होण्याच्या प्रवासात एक मैलाचा दगड ठरला आहे.



### वरिष्ठ अधिकाऱ्यांची होती उपस्थिती

नागरी विमान वाहतूक महासंचालनालय, भारतीय विमानतळ प्राधिकरण, सीमाशुल्क, इमिग्रेशन, सीआयएसएफ, सिडको तसेच अदानी एअरपोर्ट होल्डिंग्ज लिमिटेडचे वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.

> नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी हा महत्त्वाचा दिवस आहे. उड्डाण चाचणी पूर्ण करणे हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. आम्ही आता प्रत्येक टप्प्यावर सुरक्षिततेला प्राधान्य देत विमानतळ कार्यान्वित करण्याच्या एक पाऊल जवळ आलो आहोत. व्हॅलिडेशन फ्लाइट टप्पा यशस्वी करण्यासाठी आम्ही सर्व एजन्सींचे आभारी आहोत.
> - अरुण बन्सल, मुख्य कार्यकारी अधिकारी अदानी एअरपोर्ट होल्डिंग्ज लि.

### शासकीय दुखवट्यामुळे मंत्री अनुपस्थित

दोन दिवसांपूर्वी माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांचे निधन झाले. त्या करिता एक आठवडा दु:खवटा जाहिर झाल्यामुळे या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,अजित पवार व इतर राजकीय पुढारी आणि शासकीय अधिकारी अनुपस्थित होते. यापूर्वी ११ ऑक्टोबर रोजी सी-२९५ हे भारतीय वायुदलाचे विमान गांधीनगरहून तर सुखोई ३० हे पुण्यातून आले व नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरले होते. सी २९५ विमान एअरक्राफ्टची लँडिंग आणि सुखोई ३० एअरक्राफ्टची चाचणी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, नागरी उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, तत्कालीन उपमुख्यमंत्री मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झाले होते.



### मेट्रोसह बुलेट ट्रेनची कनेक्टिव्हिटी

नवी मुंबई विमानतळावर विविध कनेक्टिव्हिटी असणार आहे. मेट्रोसह बुलेट ट्रेनची कनेक्टिव्हिटी या ठिकाणी असणार आहे. एक्सप्रेस वे, उपनगरीय रेल्वे, जलमार्गाची कनेक्टिव्हिटी असणार आहे. त्याचा फायदा ठाणे, कल्याण, पुणे, मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्राला होणार आहे. हे विमानतळ एक माईलस्टोन असणार आहे. या विमानतळामुळे मुंबई विमानतळावरील भार कमी होणार आहे.



### एअरपोर्ट प्रॉजेक्ट ४ टप्प्यात पूर्ण होणार

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ रायगड जिल्ह्यात उलवा आणि पनवेल दरम्यान १,६०० हेक्टर जमिनीवर तयार होत आहे. त्यासाठी सिडको नोडल एजन्सी म्हणून काम करत आहे. हा ग्रीनफील्ड एअरपोर्ट प्रॉजेक्ट ४ टप्प्यात पूर्ण होणार आहे.